गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २५१ वा ● गुरुवार ०१ फेब्रुवारी २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 1 | Issue 251 | Date : 01/02/2024 blow :Thursday Page 4 Price 4

## भारत सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था, १० वर्षात २५ कोटी लोक गरिबीतून बाहेर : राष्ट्रपती

नवी दिल्ली : देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन या उद्या म्हणजे १ फेब्रुवारीला अर्थसंकल्प सादर करणार आहेत. त्यापूर्वी आजपासून अर्थसंकल्पीय अधिवेशनाला औपचारिकपणे सुरुवात झाली. या अधिवेशनाच्या पार्श्र्वभूमीवर भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संसदेत अर्थसंकल्पासंदर्भात खासदारांना संबोधीत केलं. मागील वर्ष भारतीय अर्थव्यवस्थेसाठी चांगले गेले आहे. भारत सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून उदयास आला असल्याचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या. तसेच गेल्या १० वर्षात २५ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढल्याचेही त्या म्हणाल्या. जम्मू-काश्मीरमधील आरक्षणामुळं राज्याच्या विकासाला गती मिळेल, असंही त्यांनी सांगितलं.

कोणताही देश तेव्हाच प्रगती करतो जेव्हा तो तरुणांच्या क्षमतेचा पुरेपूर फायदा घेतो असेही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या. भारतातील लोकांना राम मंदिर उभारणीची वर्षानुवर्षे अपेक्षा होती आणि आता हे स्वप्न पूर्ण झाले आहे. तसेच जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० हटवण्याबाबत शंका व्यक्त केल्या जात होत्या, मात्र, ते देखील हटवण्याचा निर्णय झाल्याचे राष्ट्रपती म्हणाल्या. संसदेने तिहेरी तलाकविरोधात कायदा केला आहे. याच संसदेने शेजारी देशातून येणाऱ्या अत्याचारित नागरिकांना भारतीय नागरिकत्व देण्याचा कायदा केला आहे. तसेच सरकारने मिशन मोडवर लाखो नोकऱ्या दिल्या आहेत. वन रँक



वन पेन्शनची तरतूद केली आहे. भारतीय लष्करात प्रथमच चीफ ऑफ डिफेन्स स्टाफची नियुक्ती करण्यात आल्याचे राष्ट्रपती म्हणाल्या. आमच्या सरकारच्या १० वर्षांच्या कार्यकाळात २५ कोटी लोक दारिद्र्यरेषेतून बाहेर आले आहेत. २५ कोटी लोकांची गरिबी दूर झाली असून देशातील उर्वरित लोकांसाठी हा आशेचा किरण असल्याचे राष्ट्रपतींनी म्हटले आहे. त्यामुळं सध्या भारत योग्य दिशेने वाटचाल करत आहे. तसेच सरकार योग्य निर्णय घेत असल्यानं आत्मविश्र्वास वाढत असल्याचे राष्ट्रपती म्हणाल्या.

**भारताची निर्यात वाढली** गेल्या १० वर्षांत आपण भारताला पहिल्या पाच अर्थव्यवस्थांमध्ये सामील झाला आहे. भारताची निर्यात सुमारे ४५० अब्ज डॉलरवरुन ७७५ बिलियन डॉलरपेक्षा जास्त झाली असल्याचे राष्ट्रपतींनी म्हटलं आहे. एफडीआय पूर्वीच्या तुलनेत दुप्पट झाला आहे, खादी आणि ग्रामोद्योग उत्पादनांची विक्री चार पटीने वाढली असल्याचा उल्लेख देखील राष्ट्रपतींनी आपल्या भाषणात केला आहे.

**आयटीआर भरणाऱ्यांची संख्या वाढली**दरम्यान, आयटीआर भरणाऱ्यांची संख्या ३.१५ कोटींवरुन ८.१५ कोटी झाली आहे. ही वाढ दुप्पट आहे. दशकभरापूर्वी देशात केवळ काहीसे स्टार्टअप होते. जे आज एक लाखांहून अधिक झाले आहेत. वर्षभरापूर्वी ९४ हजार स्टार्टअपची नोंदणी झाली होती. जी गेल्या वर्षी १.६ लाख झाली आहे. जीएसटी भरणाऱ्यांची संख्या १.४ कोटींवर पोहोचली आहे.

**१० वर्षात २१ कोटींहून अधिक वाहनांची खरेदी**

गेल्या १० वर्षात देशातील जनतेने २१ कोटींहून अधिक वाहनांची खरेदी केली आहे. २०१४-१५ मध्ये २००० इलेक्ट्रिक वाहनांची विक्री झाली होती, तर २०२३-२४ मध्ये डिसेंबर महिन्यापर्यंत १५ लाख इलेक्ट्रिक वाहनांची विक्री । पान २ वर


## मनोज जरांगे पाटील १० फेब्रुवारीपासून बेमुदत उपोषणाला बसणार



मुंबई : मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी मनोज जरांगे पाटील गेल्या अनेक महिन्यांपासून लढा देत आहेत. सातत्याने आंदोलन आणि उपोषणं करून त्यांनी सरकारला जंग जंग पछाडलं आहे. दरम्यान, मनोज जरांगे हे लाखो मराठ्यांचा मोर्चा घेऊन मुंबईच्या वेशीवर धडकले होते. मराठा आंदोलकांनी मुंबईत चक्काजाम आंदोलन करण्याची योजना आखली होती. परंतु, मराठा आंदोलक मुंबईच्या वेशीवर (वाशी, नवी मुंबई) दाखल होताच राज्य सरकारने तातडीने मराठा आरक्षणाबाबत अधिसूचना काढली. त्यानुसार कुणबी नोंदी असलेल्या मराठा कुटुंबांना कुणबी जातप्रमाणपत्र देऊन त्यांचा ओबीसीत समावेश केला जाणार आहे. तसेच ओबीसीत समाविष्ट केलेल्या मराठा व्यक्तीच्या शपथपत्रावर त्यांच्या सगेसोयऱ्यांनाही जातप्रमाणपत्र देण्यास राज्य सरकारने हिरवा कंदील दाखवला आहे.

दरम्यान, सगेसोयरेसंदर्भात सरकारने काढलेल्या अधिसूचनेचं कायद्यात रुपांतर व्हावं. पुढील १५ दिवसांत विशेष अधिवेशन बोलावून हा कायदा पारीत करावा अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. त्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मराठ्यांना सरसकट आरक्षण मिळालेलं नाही. त्यावरून जरांगे पाटील यांनी मंगळवारी (३० जानेवारी) राज्य सरकारला इशारा दिला होता की, उद्यापासून या अधिसूचनेची अंमलबजावणी सुरू केली नाही तर १० फेब्रुवारीपासून मी बेमुदत उपोषणाला बसेन. दरम्यान, राज्य सरकारने अद्याप या अधिसूचनेची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केलेली नाही. त्यामुळे मनोज जरांगे पाटील येत्या १० फेब्रुवारीपासून बेमुदत उपोषणाला बसणार आहेत. । पान २ वर

## झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना ईडीने केली अटक



नवी दिल्ली : झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना अटक करण्यात आली आहे. आज ईडीने हेमंत सोरेन यांना चौकशीसाठी बोलवलं होतं. त्यांची चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली आहे. जमीन घोटाळा प्रकरणात आज हेमंत सोरेन यांची चौकशी करण्यात आली. काही तासांच्या चौकशीनंतर हेमंत सोरेन यांना अटक करण्यात आली आहे. त्यांनी काही वेळापूर्वीच त्यांचा राजीनामा राज्यपालांकडे सुपूर्द केला. त्यानंतर हेमंत सोरेन यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे झारखंडमध्ये राजकीय संकट निर्माण झालं आहे. इंडियन एक्स्प्रेसने याविषयीचं वृत्त दिलं आहे.

झारखंडमधील जमीन घोटाळ्याशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात ईडीने हेमंत सोरेन यांची चौकशी ईडीकडून करण्यात आली. यानंतर हेमंत सोरेन मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्यासाठी राजभवनात पोहोचले. दरम्यान, सत्ताधारी पक्षाचे आमदारही रांची येथील राजभवनात पोहोचले. चंपई सोरेन यांनी राज्यपालांची भेट घेऊन सरकार स्थापनेचा दावा केल्याचे सांगण्यात येतं आहे.। पान २ वर

## वंचितचा महाविकास आघाडीत समावेश झालेला नाही, प्रकाश आंबेडकरांचं वक्तव्य

मुंबई : महाविकास आघाडीत वंचित बहुजन आघाडीला समाविष्ट करून घेण्यात आल्याच्या बातम्या नुकत्याच प्रसिद्ध झाल्या होत्या. मंगळवारी (३० जानेवारी) मुंबईतील ट्रायडंट हॉटेलमध्ये झालेल्या महाविकास आघाडीच्या बैठकीत वंचितला मविआत घेण्याचा निर्णय घेण्यात आल्याचा दावा अनेक वृत्तवाहिन्यांनी केला होता. तसेच महाविकास आघाडीने अधिकृत पत्रक जारी करून वंचितला मविआत सहभागी करून घेतल्याचं जाहीर केलं होतं. या पत्रकावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, शिवसेनेच्या ठाकरे गटाचे



खासदार संजय राऊत आणि राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. परंतु, वंचित बहुजन आघाडीचा महाविकास आघाडीत समावेश झालेला नाही, असं वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी जाहीर केलं आहे.

प्रकाश आंबेडकर यांची अकोला येथे पत्रकार परिषद पार पडली. यावेळी प्रकाश आंबेडकर यांनी वंचितच्या मविआतील समावेशाबाबत त्यांची भूमिका स्पष्ट केली. प्रकाश आंबेडकर म्हणाले, अद्याप वंचितचा महाविकास आघाडीत समावेश झालेला नाही. कारण वंचित बहुजन आघाडीला महाविकास आघाडीत समाविष्ट करून घ्यायचं असेल तर काँग्रेसच्या वरच्या नेतृत्वाने (दिल्लीतलं हायकमांड) मान्यता दिली पाहिजे. हायकमांडने । पान २ वर

## मूकनायकने मुक व्यवस्थेला बोलते केले : डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण

पुणे : भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी १०४ वर्षांपूर्वी स्वातंत्र्यपूर्व काळात कर्मठ विषमताग्रस्त सामाजिक स्थितीत शोषित समाजाच्या व्यथा वेदना त्यांच्यावरील होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी ३१ जानेवारी १९२० साली मूकनायक या पाक्षिकाची सुरवात केली अग्रलेख स्वतः लिहीले पुढे विदेशात जाण्यापूर्वी पांडुरग भटकरांची संपादक पदी नियुक्ती केली तत्कालीन शोषित अस्पृश्य वर्गाला आपल्या अधिकारांची जाणीव करून दिली शोषितांची वेदना वर्तमानपत्रात प्रसिद्ध केली तर शासका ला जागत करण्याचे महान कार्य मूकनायक ने केले मूकनायकच्या लेखणीचा वारसा आपण



जतन करूया असे मत विभागप्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण यांनी बोलतांना व्यक्त केले .डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे दिनांक ३१ जानेवारी २०२४ रोजी मुकनायक वर्धापन दिनानिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस विभागप्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण, वृषाली शिंदे, आरती भोसले यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ चव्हाण म्हणाले की मुकनायक हे नाव देणारे बाबासाहेब हे जागतिक कीर्तीचे महान साहित्यिक होते .त्यांनी बहिष्कृत भारत , जनता, प्रबुद्ध भारत ही वृत्तपत्रे पुढील काळात सुरू केली मूकनायक चा वारसा दैनिक सम्राट ने पुढे नेला. डॉ बाबासाहेबांनी स्थापित केलेल्या प्रिंटिंग प्रेसच्या धर्तीवर मूकनायक पत्रकारितेचा वारसा जतन करण्यासाठी प्रिंटिंग प्रेस उभारण्यासाठी मी नियामक मंडळाच्या बैठकीत मान्यता मिळवण्यासाठी प्रयत्नशील राहील हीच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली ठरेल असे प्रतिपादन केले.

प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात यांनी मूकनायक सुरू करण्यासाठी लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आर्थिक मदत केल्याचे सांगून वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी लेखाधिकारी योगिता झानपुरे, सहाय्यक लेखाधिकारी शिंदे , देशमुख , । पान २ वर

## नागरिकांनी कुष्ठरोग रुग्णासोबत भेदभाव न करता त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करावेत : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद



सोलापूर/प्रतिनिधीः जिल्ह्यात स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान २०२४ अंतर्गत ३० जानेवारी २०२४ ते १३ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत सर्वसामान्य नागरिकांमध्ये कुष्ठरोग विषयक जनजागृती करण्यात येत आहे. कुष्ठरोग हा निदान करण्यास सोपा असून, औषध उपचाराने पूर्णतः बरा होणारा आजार आहे. कुष्ठरोगी रुग्ण शोधण्यासाठी जिल्ह्यातील शासकीय व सामाजिक बांधिलकी असलेल्या सर्व यंत्रणांनी मदत करावी. तसेच नागरिकांनी कुष्ठरुग्ण असलेल्या व्यक्तीसोबत कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी। पान २ वर

## अक्कलकोटमध्ये ५ फेब्रुवारी रोजी निघणार आंबेडकरी जनतेचा आक्रोश महामोर्चा

### पुणे मध्ये अक्कलकोट तालुक्यातील भीम सैनिकांनीही जोरदार तयारी लागले




अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट मध्ये सोमवार ५ फेब्रुवारी रोजी आंबेडकरी जनतेचा विविध प्रकारच्या मागण्यांसाठी महामोर्चा निघणार आहे, या मोर्चाचे मोठे नियोजन आणि तयारी करण्यात आली असुन विविध मागण्यांसाठी हा महा मोर्चा अक्कलकोट येथील भीम नगर येथुन निघणार आहे. या महामोर्चा साठी

चलो अक्कलकोट ची घोषणा देण्यात आली आहे. सोमवार दि. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता अक्कलकोट भिमनगर ते राजे फत्तेसिंह चौक, जूना तहसील कार्यालय, ए-वन चौक, मार्गे बस स्टॉप, या प्रमुख मार्गावरून हा भव्य आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर मोर्चातील प्रमुख विषय म्हणजे अक्कलकोट शहर व ग्रामीण भागातील दलित बांधवांवर मोठ्या प्रमाणात होत असलेला अन्याय अत्याचार, जातीयवाद, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानावर संपूर्ण भारत देश चालतो त्यांच्याच पुतळ्याची गुलबर्गा येथे विटंबना करण्यात आली होती .

घोळसगांव येथे एका व्यक्तीने मकर संक्रांतीच्या दिवशी त्याच्या धार्मिक विधीमध्ये आपल्या जातीवरून कन्नड मध्ये एकदम तुच्छ मानून खालच्या पातळीवर जाऊन शिव्या देतो, तसेच

बणजगोळ येथील जिल्हा परिषद शाळेत लहान मुलांना निळ्या रंगाचा गणवेश घालू दिला जात नाही, त्याचप्रमाणे हालहळ्ळी येथे गावच्या यात्रेत महार जातीचे लोक यायचे नाही, म्हणून आपल्या समाजातील माजी

**अक्कलकोट तालुक्यातील पुण्यामध्ये राहण्यास असलेल्या भीम सैनिकांनी पुणे मध्ये बैठक घेऊन अलीकडच्या काळात मागासवर्गीय समाजावर होत असलेल्या विविध गावातील अत्याचार संदर्भात विचार विनिमय चर्चा करण्यात आले यावेळी अक्कलकोट येथे पाच फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या आक्रोश महामोर्चा साठी जास्ती जास्त भीम सैनिकांनी सहभाग घेण्याचे आव्हान करण्यात आले**

सरपंचाच्या भावाला बेदम मारहाण करण्यात आली.व त्यांच्यावरच तु आमच्या समाजातील बाईला छेडछाड केली म्हणून खोटी केस करण्यात आली. हंजगी येथील जातीयवादी माजी सरपंच यांनी केवळ मागासवर्गीय व दिव्यांग सदस्य निवडून आल्यानंतर एका उच्च जातीच्या महिलेने आरती का केली म्हणून त्या महिलेला व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य यांना त्रास दिला जातो. तसेच अक्कलकोट तालुक्यातील मागासवर्गीय जनतेवर मोठया प्रमाणात अन्याय वाढला आहे या सर्व होत असलेल्या अत्याचारा विरुद्ध व अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्या करीता भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. हा अन्याय आज त्यांच्या वर झाला उद्या आपल्या वर हि होऊ शकतो या साठी समाजातील सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची आवाहन आयोजकांनी केले आहे तरी सर्वांनी आपापसातील व्ययक्तीक व राजकीय मतभेद विसरून सर्वांनी एकत्र येऊन परिवारासह ह्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होऊन जातीयवादी लोकांना आपली ताकद दाखवून द्यावे असे आवाहन तमाम भीम सैनिकांनी केले आहे सोमवार दि. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता भिम नगर, अक्कलकोट येथुन प्रारंभ होणार आहे. तालुक्यातील सर्व गावांना गाव भेटी देऊन चर्चा ,मीटिंग घेऊन मागासवर्गीय समाजावर होत असलेल्या अन्याय अत्याचार बाबत जनजागृती तालुक्यातील सर्व पक्षीय नेते मंडळी करत आहेत

# संपादकीय

## राजकारणाचा रंग...

जनता दल युनायटेड या पक्षाचे प्रमुख नेते नितीशकुमार यांनी बिहारच्या मुख्यमंत्रिपदाची आणखी एकदा शपथ घेतली आणि बिहारी राजकारणाचा एक वेगळाच रंग समोर आला. राजकारणामध्ये जेव्हा एखाद्या राज्याचा मुख्यमंत्री बदलतो तेव्हा त्याचे नावही बदलते; पण बिहारमध्ये मात्र मुख्यमंत्री तोच राहतो फक्त त्याचे मित्रपक्ष बदलत राहतात. हे अनेक वेळा सिद्ध झाले आहे. हे सिद्ध करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका नितीशकुमार यांनीच बजावली आहे. कधी केंद्रात सत्तेवर असलेल्या भाजपसोबत मैत्री करायची आणि कधी लालूप्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलासोबत मैत्री करायची आणि मुख्यमंत्रिपदावर कायम राहायचे हा राजकारणाचा डाव कित्येक वर्षे नितीशकुमार खेळत आहेत. पुन्हा एकदा त्यांनी तोच डाव खेळला आहे. साहजिकच बिहारच्या राजकीय इतिहासात बिहारचे मुख्यमंत्री म्हणून नवव्यांदा शपथ घेतली, अशी नोंद नितीशकुमार यांच्या नावावर जरी झाली असली तरी अनेक वेळा त्यांनी पाच वर्षांच्या कालावधीमध्ये नवीन मित्रांसोबत शपथ घेतली आहे. ज्या प्रकारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप आघाडीला आव्हान निर्माण करण्यासाठी 'इंडिया' आघाडीचा प्रयोग समोर येत होता आणि त्यासाठी नितीशकुमार हेच पुढाकार घेत होते. ते पाहता आता तेच नितीशकुमार हेच एनडीएचा घटक पक्ष झाल्याने इंडिया आघाडीला धक्का बसला आहे जेव्हा आगामी लोकसभा निवडणूक होईल तेव्हा बिहारमधील यश भाजपसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. देशातील लोकसभा निवडणुकीच्या जागांच्या संदर्भात तिसऱ्या क्रमांकाचे मोठे राज्य असलेल्या बिहारमध्ये चांगली कामगिरी करण्यासाठी नितीशकुमार यांची मैत्री भाजपलाही हवी असल्याने त्यांनी पूर्वीचे सर्वकाही विसरून नितीशकुमार यांना मैत्रीचा हात दिला. जसा 'आयाराम आणि गयाराम' हा वाक्प्रचार गेल्या काही वर्षांमध्ये लोकप्रिय झाला आहे त्याच धर्तीवर आता नितीशकुमार यांना समोर ठेवून पलटूराम हा वाक्प्रचारही लोकप्रिय होऊ लागला आहे. बिहारमध्ये सत्तेत सहभागी झालेल्या भाजपलासुद्धा नितीशकुमार यांची ही पलटूराम प्रतिमा लक्षात ठेवावी लागणार आहे. कारण यापूर्वी किमान दोन वेळा नितीशकुमार यांनी भाजपची साथ सोडली होती. ते पुन्हा तसे करणार नाहीत त्याची कोणतीही खात्री देता येत नाही. पण सध्या तरी भाजपसाठी लोकसभा निवडणूक महत्त्वाची असल्याने ही निवडणूक होईपर्यंत नितीशकुमार यांच्याबरोबरची मैत्री भाजप इमाने इतबारे निभावेल. त्यानंतर पुन्हा एकदा राजकारणाचा वेगळा रंग दिसण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# आमदार अनिल बाबर यांच्या पार्थिवावर येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

## सर्वसामान्यांसाठी काम करणारा आदर्श लोकप्रतिनिधी हरपला : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

सांगली : आमदार अनिल बाबर विश्र्वासू सहकारी होते. आम्ही अनेक वर्षे एकत्र काम केले. ते कमी बोलून जास्त काम करणारे, साधी राहणी व उच्च विचारसरणी असणारे लोकप्रतिनिधी होते. सर्वसामान्य माणूस सर्वसामान्यांसाठी किती काम करु शकतो हे दाखवून देणारे ते आदर्श लोकप्रतिनिधी होते, अशा शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज आमदार अनिल बाबर यांना श्रद्धांजली अर्पण केली.खानापूर – आटपाडी मतदारसंघाचे आमदार अनिल बाबर यांचे अल्पश: आजाराने सांगली येथील खासगी रुग्णालयात आज पहाटे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज खानापूर तालुक्यातील गार्डी या त्यांच्या मूळ गावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कामगार मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे, उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, आमदार अरुण लाड, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार जयंत पाटील, आमदार सुमनताई पाटील, आमदार विश्र्वजित कदम, आमदार मानसिंगराव नाईक, आमदार विक्रम सावंत, आमदार शहाजी पाटील, जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, पोलीस अधीक्षक डॉ. बसवराज तेली, महानगरपालिका आयुक्त सुनील पवार, माजी आमदार सर्वश्री शिवाजीराव नाईक, पृथ्वीराज देशमुख, मोहनराव कदम, दिनकर पाटील आदींसह सर्वपक्षीय नेते,



अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, अनिल बाबर यांनी त्यांच्या मतदारसंघासाठी खूप काम केले. कृषी, पाणी, रस्ते, वीज इत्यादी कामांबाबत त्यांचा पाठपुरावा नेहमी असायचा. अनेक संस्था त्यांनी उभ्या केल्या. जनतेने प्रेम, जिव्हाळा व आत्मियता त्यांना दिली. लोकांच्या या ऋणातून उतराई होण्यासाठी मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करुन प्रत्येकाला त्याच्या पायावर उभे राहण्यासाठी त्यांनी मदत केली. टेंभू योजनेसाठी त्यांचे योगदान सदैव स्मरणात राहील. अन्य राज्यातही त्यांचा मोठा जनसंपर्क होता.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, आमदार अनिल बाबर यांनी सांगली जिल्ह्यातील विटा परिसरामध्ये तळागाळातून काम सुरु केले होते. सरपंच, जिल्हा परिषद सदस्य आणि चारवेळेस आमदार म्हणून त्यांनी या भागाची सेवा केली. या भागात पाणी पोहोचले पाहिजे, सिंचन झाले पाहिजे या करिताचे त्यांचे प्रयत्न कोणीच विसरु शकत नाही. जनसामान्यांशी आणि मातीशी जोडलेला नेता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. जनसामान्यांचा एक नेता हरवला, अशा प्रकारची भावना त्यांच्या जाण्यामुळे निर्माण झाली आहे.

पालकमंत्री डॉ. खाडे यांनी अनिल बाबर आणि आपला चांगला स्नेहबंध होता. त्यांच्या निधनाने ज्येष्ठ मार्गदर्शक सहकारी निघून गेला आहे, अशा शब्दात भावना व्यक्त केल्या. मंत्री श्री. केसरकर यांच्यासह मान्यवरांनी आमदार अनिल बाबर यांच्या विषयीच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री आणि अन्य मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण करुन श्रद्धांजली वाहिली. जिल्हा प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्यासह जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी श्रीमती धोडमिसे यांनी पुष्पचक्र अर्पण करुन श्रध्दांजली वाहिली. आमदार अनिल बाबर यांच्या पार्थिवास पोलीस दलाच्या जवानांनी बंदुकीच्या तीन फैरी झाडून मानवंदना दिली. आमदार अनिल बाबर यांना अखेरचा निरोप देण्यासाठी जनसागर लोटला होता. आमदार अनिल बाबर यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाच्या मुंबईतील नव्या कार्यालयाचे उद्घाटन

मुंबई : राज्यातील सर्व महत्त्वाची कार्यालय ही मुंबई येथे आहेत. त्यामुळे लोकांना आपल्या समस्या मांडण्यासाठी सोयीचे व्हावे यासाठी राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे नवीन कार्यालय मुंबई येथे सुरू करण्यात आले आहे. हे कार्यालय महाराष्ट्र व गोवा या राज्यासाठीचे राज्य कार्यालय असणार असल्याची माहिती राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे अध्यक्ष अरुण हलदर यांनी दिली. राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाच्या मुंबईतील नव्या कार्यालयाचे उद्धाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी आयोगाचे सदस्य सुभाष पारधी, अंजू बाला, सामाजिक न्याय विभागाचे सहसचिव दिनेश डिंगळे उपस्थित होते. श्री. हलदर म्हणाले, अनुसूचित जातींसाठी असलेल्या केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा आढावा राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगामार्फत घेण्यात येतो. योजनांची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी आयोगामार्फत राज्याच्या विविध विभागांना निर्देश देण्यात येतात. अनुसूचित जातीच्या समाजातील समस्यांचे निराकरण मुंबई येथील कार्यालयातून करण्यात येईल. आयोगाने ऑनलाइन पोर्टल सुरू केले आहे त्यामुळे ऑनलाईनही तक्रार नोंदविता येते,असेही त्यांनी यावेळी सांगितले.

श्री.पारधी म्हणाले, अनुसूचित जातीतील समाजाच्या लोकांना आपल्या समस्या मांडण्यासाठी मुंबई येथील कार्यालय हे सोयीचे झाले आहे. राज्यातील सर्व भागातील लोक मुंबई येथे कामानिमित्त येतात. सर्व क्षेत्रिय कार्यालय मुंबई येथे असल्यामुळे लोकांना मुंबई येथे येणे सोयीचे आहे.सदस्या अंजू बाला म्हणाल्या, अनुसूचित जातीतील समाजाच्या लोकांनी आयोगाकडे आपल्या समस्या मांडण्यासाठी यावे. लोकांना आपले हक्क माहिती करुन द्यावेत. आयोग नागरिकांच्या हक्कासाठी काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.सहसचिव दिनेश डिंगळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे संचालक कौशल कुमार यांनी कार्यक्रमाचे आभार मानले. तर मागासवर्ग अधिकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष भारत वानखेडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. हे कार्यालय निष्ठा भवन, चौथा मजला, सीजीओ बिल्डिंग, चर्चगेट येथे सुरू झाले आहे.

पान १ वरुन

## भारत सर्वात वेगानं वाढणारी

झाली आहे. गेल्या दशकात सरकारने सुशासन आणि पारदर्शकता हा अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार बनवला आहे. ज्यामुळं भारताने मोठ्या आर्थिक सुधारणा केल्याचे राष्ट्रपती म्हणाल्या. गेल्या १० वर्षांत वित्तीय तूट नियंत्रणात आहे, तर परकीय चलनसाठा ६०० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहे. भारताची बँकिंग व्यवस्था जगातील सर्वात मजबूत बँकिंग प्रणाली बनली आहे. भारतीय बँकांचा एनपीए पूर्वी दुहेरी अंकात होता, आता तो एक अंकावर आला आहे. भारत आज जगातील दुसऱ्या क्रमांकाचा मोबाईल फोन निर्यातदार देश झाला असल्याचा उल्लेख देखील राष्ट्रपतींनी यावेळी केला.

## झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत..

चंपई सोरेन यांना ४१ हून अधिक आमदारांचा पाठिंबा आहे. ८० सदस्यीय विधानसभेत बहुमतासाठीची मॅजिक फिगर ४१ आहे.

ईडीने रांचीमध्ये लष्कराच्या ताब्यात असलेल्या ४.५५ एकर जमिनीच्या बेकायदेशीर खरेदी-विक्रीची चौकशी सुरू केली. या प्रकरणी ईडीनं रांचीच्या बडागाईन झोनचे महसूल उपनिरीक्षक भानू प्रताप प्रसाद यांना अटक केली होती. त्यांच्या राहत्या घरातून मोठ्या प्रमाणात सरकारी कागदपत्रं आणि मोबाईलही त्यावेळी जप्त करण्यात आले होते. त्यानंतर ईडीने आपला मोर्चा हेमंत सोरेन यांच्याकडे वळवला.

प्रदीप बागची, विष्णू कुमार अग्रवाल, भानू प्रताप प्रसाद आणि इतरांविरुद्ध झारखंड पोलीस आणि पश्र्चिम बंगाल पोलिसांनी दाखल केलेल्या अनेक एफआयआरच्या आधारे ईडीनं मनी लॉन्ड्रिंग कायद्याच्या कलमांखाली गुन्हा नोंदवला. या प्रकरणाचा तपास पुढे जात असताना ईडीनं आतापर्यंत १४ आरोपींना अटक केली आहे. या आरोपींनी सरकारी अधिकाऱ्यांच्या संगनमतानं भूमाफियांच्या नावे फसवणूक करून भूखंड हस्तांतरित केल्याचं तपासात उघड झालं आहे. यानंतर हेमंत सोरेन यांच्या अटकेवरुन काँग्रेस आक्रमक झाल्याचं पाहण्यास मिळतं आहे.

देशाच्या राजकारणाच्या दृष्टीने हेमंत सोरेन यांची अटक होण्याची ही घटना महत्त्वाची मानली जाते आहे. देशात पुढच्या काही दिवसांमध्ये लोकसभा निवडणुकीचं बिगूल वाजणार आहे. हेमंत सोरेन यांच्यावर भ्रष्टाचाराचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. तर दुसरीकडे झारखंड मुक्ती मोर्चा आणि काँग्रेसच्या नेत्यांकडून भाजपावर सडकून टीका केली जात आहे. जे मोदींबरोबर नाहीत त्यांना अटक केली जाते आहे किंवा त्यांच्यावर कारवाई होते आहे अशी टीका मल्लिकार्जुन खरगेंनी केली आहे.

## वंचितचा महाविकास आघाडीत ..

तशी मान्यता दिली आहे की नाही, हे अद्याप आम्हाला माहिती नाही.

वंचितचे प्रमुख म्हणाले, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आमच्याशी पत्रव्यवहार करतात. परंतु, वंचितच्या मविआतील समावेशाबाबतचा निर्णय काँग्रेस नेते अशोक चव्हाण आणि बाळासाहेब थोरात घेतील, असं आम्हाला समजलं आहे. ज्या पत्राकाबद्दल सध्या चर्चा चालू आहे त्यावर केवळ नाना पटोले यांची सही आहे. त्यावर थोरात आणि चव्हाण यांची सही नाही. दरम्यान, वंचितला मविआत अपमानास्पद वागणूक दिली गेली असल्याचं बोललं जात आहे. तरीदेखील वंचित बहुजन आघाडी २ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या मविआच्या बैठकीत सहभागी होणार का? असा प्रश्र्न प्रकाश आंबेडकर यांना विचारण्यात आला. त्यावर आंबेडकर म्हणाले, आम्हाला तिथे कशी वागणूक मिळाली याची आम्ही मोठी समस्या निर्माण करणार नाही. कारण आमचं आधीपासून एकच म्हणणं आहे की आपल्याला देशातून भाजपाचं धोकादायक सरकार उलथून टाकायचं आहे. भाजपाला विरोध म्हणून आम्ही एकत्र येत आहोत. अशा परिस्थितीत आम्ही किंवा इतर कोणीही वैयक्तिक हेवेदावे चर्चेत आणू नये. 'मी'पणा आणि भाजपा-आरएसएसचं सरकार उलथून टाकणं यापैकी एका गोष्टीला प्राथमिकता द्यायची असेल तर आम्ही भाजपा-आरएसएसचं सरकार उलथून टाकण्याला अधिक महत्त्व देऊ.

## मनोज जरांगे पाटील १०..

मनोज जरांगे पाटील यांनी काल (३० डिसेंबर) किल्ले रायगडावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केलं. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. त्यावेळी म्हणाले, या कायद्याची अंमलबजावणी वेळेत केली नाही किंवा दडपणाखाली जबाबदारी पार पाडली नाही तर आम्हाला पुन्हा अडचणीचे दिवस यायला नको. नोंदी मिळत नाहीत, समितीला मुदतवाढ दिलेली असतानाही समिती काम करत नाही. ज्यांची कुणबी नोंद मिळाली आहे त्यांना प्रमाणपत्र वाटप होणं आवश्यक आहे. त्यामुळे आपण १० फेब्रुवारीचा निर्णय घेतलेला आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले, सरकारने अधिसूचना काढून चार दिवस उलटले तरी आंतरवाली सराटीसह महाराष्ट्रातील मराठा बांधवांवरील गुन्हे मागे घेतलेले नाहीत. तुम्ही तत्काळ शब्द वापरला आहे. सरकारमधील मंत्र्यांकडून वेगवेगळी वक्तव्ये येत आहेत. त्यामुळे सरकारची भूमिका आम्हाला कळत नाही. १० फेब्रुवारीच्या आत गुन्हे मागे घ्यावे.

## मूकनायकने मुक व्यवस्थेला बोलत..

कार्यालय अधिक्षक डॉ संध्या नारखडे, सचिन जगदाळे, विधी सल्लागार हेमंत आहिवळे, प्रकल्प व्यवस्थापक नितिन सहारे, महेश गवई, डॉ सारिका थोरात, शुभांगी सुतार यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन रामदास लोखंडे यांनी केले.

## नागरिकांनी कुष्ठरोग रुग्णासोबत..

कुमार आशीर्वाद यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम व राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रमातर्गंत आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद बोलत होते. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, वैद्यकीय अधिकारी डॉ.अग्रजा चिटणीस, आरोग्यसेवा कुष्ठरोग सहाय्यक संचालक एम.के. शेगर, डॉ. मीनाक्षी बनसोडे यांच्यासह अन्य आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियानांतर्गत सर्व शासकीय यंत्रणा व सामाजिक बांधिलकी असणाऱ्या संस्थांनी सोलापूर जिल्हा कुष्ठरोग मुक्त होण्यासाठी प्रयत्न करावेत. याविषयी समाजाचे प्रबोधन करावे. तसेच या रुग्णाविषयी कोणीही भेदभाव करू नये.


प्रत्येक नागरिकांनी अशा रुग्णाविषयी सामाजिक बांधिलकी ठेवून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अथक प्रयत्न करावेत असे त्यांनी सूचित केले.

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमातर्गंत तंबाखू सेवनाच्या हानिकारक परिणामाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत. जिल्हास्तरीय अंमलबजावणी पथकामार्फत सोलापूर शहर व ग्रामीण भागात कोटपा कायदा २००३ ची प्रभावी अंमलबजावणी करावी. शाळा, महाविद्यालय स्तरावर जनजागृती करावी. तंबाखू सोडवण्यासाठी समुपदेशन करावे. या अंतर्गत विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये ही मौखिक आरोग्य तपासणी करावी असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले. तसेच राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रमाची ही जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. या अंतर्गत १० ते १९ वयोगटातील किशोर अवस्थेतील मुला मुलींवर अधिक लक्ष केंद्रित करावे. एचआयव्ही एड्स बाधितांसाठी असलेल्या संजय गांधी निराधार योजना व बाल संगोपन योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी असेही त्यांनी निर्देशित केले. डॉ. शेगर यांनी राष्ट्रीय पुस्तक निर्माण कार्यक्रमातर्गंत ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२४ या पंधरवड्यात स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान २०२४ जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली. यावर्षीचे घोषवाक्य कलंक कुष्ठरोगाचा मिठवू या, सन्मानाने स्वीकार करूया हे घोषवाक्य असल्याचे त्यांनी सांगितले. सन २०२३ मध्ये जिल्ह्याच्या ग्रामीण व शहरी भागातील ३६ लाख ५७ हजार लोकसंख्येची तपासणी केली असता संशयित कुष्ठरोग १३ हजार २८२ इतके निघाले तर त्यापैकी १२९ नवीन कुष्ठरोग बाधित रुग्ण आढळून आल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. बनसोडे यांनी जिल्ह्यात राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत ७५८ शाळा तंबाखूमुक्त शाळा म्हणून घोषित करण्यात आल्याची माहिती दिली. तसेच तंबाखू मुक्ती केंद्र मार्फत २२ हजार ६५९ रुग्णांना तंबाखू व्यसनमुक्तीवर समुपदेशन केल्याचे सांगितले. तसेच कोटपा कायदा २००३ अंतर्गत जवळपास ७७ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. माने व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नवले यांनीही अनुषंगिक माहिती बैठकीत दिली.

# आयुष्मान भारत मिशनमध्ये दिशादर्शक काम व्हावे : ओमप्रकाश शेटे

सांगली : आयुष्मान भारत मिशन उपक्रमात दिशादर्शक काम व्हावे. याबाबत कोणत्याही तक्रारी येऊ नयेत. योजनेतील त्रुटी दूर करुन सर्वंकष आयुष्मान भारत योजना करण्यावर भर आहे, असे प्रतिपादन आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी आज येथे केले.



आयुष्मान भारत व आरोग्यविषयक योजनांच्या आढावा बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक कक्षात झालेल्या या बैठकीस जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, महानगरपालिका आयुक्त सुनील पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मिलिंद पोरे यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी, यादीतील रूग्णालयांचे प्रतिनिधी, आरोग्यविषयक काम करणारे कार्यकर्ते उपस्थित होते.

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमात सांगली जिल्ह्याने केलेल्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त करून ओमप्रकाश शेटे म्हणाले, सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे हे आरोग्य यंत्रणांचे कर्तव्य आहे. रुग्णांचे जीवित त्यांच्या हातात असते. त्यामुळे ग्रामीण व शहरी भागात आयुष्मान भारत योजनेचे काम राष्ट्रकार्य म्हणून करावे, असे आवाहन त्यांनी केले.

महात्मा फुले जनआरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अर्थात आयुष्मान योजना याचे एकत्रीकरण करत सामान्य लोकांना जास्तीत जास्त आरोग्यविषयक लाभ देण्यासाठी सर्वंकष करण्यासाठी आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या प्रमुख पदी श्री. शेटे आहेत. या योजनेचा लाभ जास्तीत जास्त सर्वसामान्य लोकांना देण्यासाठी ते सध्या राज्याचा संवाद दौरा करीत आहे. आज सांगली जिल्हा दौऱ्यामध्ये त्यांनी गोल्डन कार्ड वितरण, आयुष्मान कार्ड वितरण, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम व त्यातील उल्लेखनीय काम यासह रूग्ण व रूग्णालयांच्या अडचणी, अन्य तक्रारी, योजना प्रत्यक्षात राबविण्यात येणाऱ्या त्रुटी यांचा आढावा त्यांनी घेतला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# नांदूर मध्यमेश्वर गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा

## कारवाईच्या निवेदनाला केराची टोपली

निफाडः नांदूर मध्यमेश्र्वर गोदावरी नदीपात्रातून दिवसाढवळ्या अवैध वाळू वाहतूक होत असून त्यामुळे आम्ही पदर खर्चाने बनविलेले आमचे शिवार रस्ते नादुरुस्त झाल्याने शेतमाल वाहतुकीला अडचणी येत आहेत .त्यामुळे सदरचा अवैध वाळू उपसा तात्काळ बंद करण्यात यावा अन्यथा निफाड तहसिल कार्यालयासमोर उपोषण करण्यात येईल असा इशारा शेतकरी शशिकांत गणपत शिंदे. भारत गणपत डांगले.अरविंद बाळासाहेब शिंदे यांचेसह शेतकऱ्यांनी दिला आहे.

निफाडचे तहसिलदार शरद घोरपडे.उपविभागीय अधिकारी हेमांगी पाटील.उपविभागीय पोलिस अधिकारी निलेश पालवे .मंडल अधिकारी .कामगार तलाठी .यांना दिनांक ६./११/२०२३ रोजी नांदूर मध्यमेश्र्वर शेतकऱ्यांचे वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की आमचे शेतात ये जा करण्यासाठी आम्ही स्वखर्चाने शिवार रस्ते बनविले होते.मात्र गोदावरी नदीपात्रातून रात्रीचे तसेच दिवसा देखील मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा होत असल्याने आमच्या शिवार रस्त्यावर मोठ.मोठे खड्डे पडल्याने शेतमाल काढण्याबरोबरच आम्हाला शेतात जाण्या येण्यासाठी अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे.त्यामुळे हा अवैध वाळू उपसा तात्काळ बंद करण्यात यावा अशी मागणी वारंवार करून तसेच नांदूर मध्यमेश्र्वर चे मंडळ अधिकारी.कामगार तलाठी यांना देखील समक्ष भेटून कारवाई करण्याची मागणी केली होती. मंडळ अधिकारी आणि कामगार तलाठी यांची बदली झाली तरी वाळू वाहतूक करणाऱ्यावर कुठलीही कारवाई झालेली नाही.परिणामी गोदावरी नदीपात्रातून राजरोस पणे वाळू उपसा सुरू असून .या अवैध वाळू उपसा करणाऱ्यांचे मनोधैर्य वाढले आहे. त्यामुळे आमच्या जीवितास धोका वाढला असून आमचे काही बरेवाईट झाले तर त्याची जबाबदारी सरकारची राहील. वारंवार निवेदने देवून देखील महसूल अथवा पोलिस प्रशासन कुठलीही कार्यवाही करीत नसल्याने आता आम्ही मुख्यमंत्री .उपमुख्यमंत्री.महसूल मंत्री.पालकमंत्री. जलसंधारण मंत्री .आमदार .जिल्हाधिकारी यांना देखील निवेदने पाठवून याकडे लक्ष वेधनार आहोत. कारण स्थानिक प्रशासनातील अधिकाऱ्यांनी आतापर्यंत कुठलीही कार्यवाही केलेली नाही.तसेच आम्ही दिलेल्या निवेदनाला देखील केराची टोपली दाखवली आहे.त्यामुळे आमचा स्थानिक अधिकाऱ्यांवर विश्र्वास राहिलेला नाही.त्यामुळे हा वाळू उपसा तात्काळ बंद झाला पाहिजे यासाठी स्थानिक अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करावी अन्यथा आम्ही बेमुदत आमरण उपोषण सुरू करू असा इशारा निवेदनाद्वारे शेतकऱ्यांनी दिला आहे.

# पोलीस अधिकाऱ्याची आत्मचरित्रे पोलिसांना मार्गदर्शक : नरेंद्र वाबळे



मुंबई : वाचनाने माणसाचे व्यक्तिमत्व घडते. संस्कारक्षम वयातील वाचन माणसाचे चरित्र घडवीते. म्हणून प्रत्येकाने वाचलेच पाहिजे. विशेषत: पोलिसांनी निवृत्त वरिष्ठ पोलीस अधिकार्यांची आत्मचरित्रे अवश्य वाचावीत. त्याचा त्यांना लाभच होईल, असे उद्गार मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. नरेंद्र वि. वाबळे यांनी काढले. मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयाने आयोजित केलेल्या नवोन्मेष व्याख्यानमाला – २०२४ चे पहिले पुष्प गुंफताना उद्घाटक व्याख्याते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी पोलीस आयुक्त लोहमार्ग, मुंबई डॉ. रवींद्र शिसवे होते. प्रारंभी डॉ. शिसवे यांनी पुष्पगुच्छ देऊन श्र. वाबळे यांचा सत्कार केला.

'वाचन : एक सुखद प्रवास' या विषयावर बोलताना श्री. वाबळे म्हणाले की, जन्माला आल्यावर माणसाचा जीवनप्रवास सुरू होतो. तो शाळेत जाऊ लागल्यावर लिहू-वाचू लागतो. त्यानंतर त्याचा वाचनप्रवास सुरू होतो. लहानपणी वाचलेली चांगली पुस्तके माणसाचे चरित्र घडवितात. आम्हाला आमच्या आईने वाचनाची गोडी लावली. आम्हा भावंडांना आई रोज दुपारी गोष्टी वाचून दाखवीत असे. त्या गोष्टीतील पराक्रमी आणि परोपकारी नायक नकळत आमचा हिरो बनत असे. त्या नायकाप्रमाणे आपणही परोपकारी व्हावे, इतरांना मदत करावी हे संस्कार बालपणीच वाचनामुळे आमच्यावर बिंबविले गेले.

आपण अनेक निवृत्त पोलीस अधिकार्यांची आत्मचरित्रे वाचली आहेत. त्यातील रमाकांत कुलकर्णी यांचे 'फुटप्रिंट्स् ऑन द सँड ऑफ क्राईम', ज्युलियो रिबेरो यांचे 'बुलेट फॉर बुलेट' इत्यादी पुस्तके मला विशेष भावली. अगदी अलिकडच्या काळात माजी पोलीस महासंचालक राकेश मारीया, निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त सर्वश्री सुरेश वलीशेट्टी, विलास तुपे, व्यंकट पाटील आणि अरुण वाबळे यांची पुस्तके मला खूप आवडली. त्यातून गुन्हेगारी जगताविषयी महत्वाची माहिती मिळाली. त्यांपैकी अरुण वाबळे यांचे पुस्तक तर गुन्हा अन्वेषणाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे. आपण ते आपल्या पोलिसांना वाचायला सांगावे. तसेच अरुण वाबळे यांचे खास व्याख्यान पोलिसांसमोर अवश्य ठेवावे, असे आवाहन श्री. वाबळे यांनी आयुक्त डॉ. शिसवे यांना केले.

पोलीस आणि पत्रकार यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंध समाजाच्या दृष्टीने उपयुक्त ठरतात, असे सांगताना त्यांनी या संदर्भातील काही उदाहरणे दिली. कुविख्यात चार्ल्स शोभराज तिहार तुरुंगातून पळाला तेव्हा एका सांज दैनिकाने इन्सपेक्टर मधुकर झेंडे यांचा फोटो छापून त्यांनी पहिल्यांदा शोभराजला पकडले होते अशी बातमी दिली. ती बातमी तत्कालीन पोलीस महासंचालक सूर्यकांत जोग यांनी वाचली. त्यानंतर त्यांनी झेंडे यांना बोलवून घेतले. त्यांच्या नेतृत्वाखाली पोलीसांचे एक पथक तयार केले. नंतर झेंडे यांच्या सूचनेवरूनच हे पथक शोभराजला पकडण्यासाठी गोव्याला रवाना झाले. पुढे काय घडले हा इतिहास ताजा आहे. माजी गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांनी वर्तमानपत्रातील एक बातमी वाचली. एक गुन्हेगार उजळ माथ्याने फिरत होता. पण तो फरारी असल्याचे पोलीस सांगत होते, अशी ती बातमी होती. बाळासाहेबांनी ताबडतोब राज्याच्या पोलीस महानिरिक्षकांना फोन करून त्या गुन्हेगाराला गजाआड करण्याचे आदेश दिले. पोलिसांनी त्याला काही तासात पकडले. अशा काही मनोरंजक आठवणी सांगून श्री. वाबळे यांनी उपस्थित पोलीस अधिकार्यांना मंत्रमुग्ध केले.

उपायुक्त, मध्य परिमंडळ, लोहमार्ग मुंबई श्री. मनोज पाटील यांनी आभार मानले.

# धम्मज्योती गजभिये यांनी दिली बार्टी यूपीएससी प्रशिक्षण केंद्रास भेट

येरवडाः डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे संचलित युपीएससी प्रशिक्षण केंद्र येरवडा , पुणे येथे २९ जानेवारी रोजी धम्मज्योती गजभिये – व्यवस्थापकीय संचालक चर्मोद्योग विकास महामंडळ तथा सदस्य राष्ट्रीय अनुसूचित जाती वित व विकास महामंडळ भारत सरकार यांनी युपीएससी प्रशिक्षण केंद्रास सदिच्छा भेट दिली.तसेच त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून नागरी सेवेत जाण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्र्चित करून अभ्यास करावा बार्टीच्या वतिने विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत .

या संधीचा फायदा उमेदवारांनी घेऊन आपले भविष्य उज्वल करावे व सनदी प्रशासकीय अधिकारी होऊन समाजसेवा व देश सेवा करावी जानेवारी २०२४ पासून प्रशिक्षण केंद्रात स्पेशल ३६ बॅचसाठी सुरू करण्यात आलेला बार्टी यूपीएससी प्रिलीम कोर्स व टेस्ट सिरीज २०२४ या कोर्समध्ये दिल्ली येथील नामवंत विषय तज्ञ बार्टी येथे येऊन शिकवणी घेत असल्याबद्दल या नावीन्यपूर्ण कोर्स सुरू केल्याबद्दल त्यांनी श्री विकास गायकवाड यांचे कौतुक केले.बार्टी मार्फत युपीएससी प्रशिक्षणाच्या विविध योजना मा सचिव सामाजिक न्याय विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली राबविल्या बदल त्यांचे आभार व्यक्त केले. व बार्टी संस्थेचे मा महासंचालक सुनिल वारे, विभागप्रमुख सतीष पाटील यांचे अभिनंदन केले.

यूपीएसी प्रशिक्षण केंद्राच्या वतीने द प्रॉब्लेम ऑफ रुपी शताब्दी वर्षानिमित्त सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक विकास गायकवाड यांनी धम्मज्योती गजभिये , व्यवस्थापकीय संचालक– चर्मोद्योग विकास महामंडळ, रवींद्र कदम , विभागप्रमुख बार्टी यांना द प्रॉब्लेम ऑफ रुपी ग्रंथ भेट देऊन सन्मान केला.



याप्रसंगी ग्रंथपाल – विनायक भालेराव, वस्तीग्रह अधिक्षक– रणजित पात्रे रामदास लोखंडे आदी उपस्थित होते.

# जिल्हा नियोजन समितीचे सदस्य गणेश चीवटे यांच्या विकास निधीतून वीट येथे ८१.५ लक्ष रुपयांचा विकास कामाचे उद्घाटन



पंढरपूर/प्रतिनिधीः सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील व माढा लोकसभा विद्यमान खासदार रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून मौजे वीट गावासाठी ८१.५ लक्ष रुपयांचा विविध विकास कामाचे जिल्हा नियोजन समितीचे सदस्य गणेश चिमटे यांच्या हस्ते करण्यात आले

यामध्ये वीट ते बर्डे वस्ती रोड दहा लाख रुपये इनामदार वस्ती ते अडाळी वस्ती रोड सहा लाख रुपये शाळा दुरुस्ती यामध्ये बीड गाव शाळा दोन लाख रुपये गाडी वस्ती शाळा तीन लाख रुपये खोपडे वस्ती शाळा दोन लाख रुपये रेवनाथ मंदिर पत्रा शेड व घड बांधणी सात लाख रुपये राजू चांदणे ते होंडा बाई चांदणे घर व अण्णाभाऊ साठे नगर सात लाख रुपये आरोग्य उपकेंद्र दुरुस्ती सात लाख रुपये दलित वस्ती स्मशानभूमीकरण दलित वस्ती पेपर ब्लॉक रोड चार लाख रुपये सुभाष जाधव वस्ती डीपी चार लाख रुपये गाडी वस्ती ते अंकुश ढेरे वस्ती रोड पाच लाख रुपये हनुमंत सपाटे डीपी तीन लाख रुपये भोसले वस्ती डीपी साडेआठ लाख रुपये स्वीट लाईट पाच दिवे आठ लाख रुपये इत्यादी कामाचा समावेश आहे

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भावना गिरी गोसावी यांनी केले तर गणेश चीवटे त्यांनी आपले मनोगत पेडगावच्या विकासासाठी भविष्यातील जास्तीत जास्त निधी खासदार रणजीत सिंह नाईक निंबाळकर पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या माध्यमातून आणण्याचा प्रयत्न करील असे अभिवचन दिले.वीट गावासाठी गणेश बावणे भरगोस निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल वीट गावच्या वतीने त्यांचे आभार मान्यता

या विकास कामाचा भूमिपूजन प्रसंगी जिल्हा परिषद सदस्य बिबीशन आवटे विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन बाळासाहेब गाडे सरपंच जाधव भावना गिरी गोसावी ढेरे देविदास ढेरे हर्षद गाडे ग्रामपंचायत सदस्य गजानन भोसले विशाल गंगे महादेव जाधव गणेश ढेरे जालिंदर निंबाळकर रोजगार हमी सेवक कृष्णा ढेरे

माजी उपसरपंच समाधान कांबळे सुभाष जाधव ग्रामपंचायत सदस्य अविनाश पवार प*** गाडे डॉक्टर बाळासाहेब ढेरे तंटामुक्ती अध्यक्ष दत्तात्रय गाडे विश्र्वनाथ ढेरे माजी ग्रामपंचायत सदस्य आप्पा जाधव अर्जुन आवटे अशोक राऊत जालिंदर गाडी रवी ढेरे अविनाश गाडे लहू गाडे अमोल आढळे विलास जाधव अश्रू कांबळे रवी गाडे गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

# प्रांताअधिकारी हेमांगी पाटील नैताळे येथील श्री मतोबा चरणी नतमस्तक



निफाड : निफाड तालुक्यातील नाशिक संभाजीनगर महामार्गावर असलेल्या नैताळे येथील भाविक भक्तांच्या हाकेला धावणारे, भक्तांची इच्छा पूर्ण करणारे, जागृत देवस्थान, ग्रामस्थांचे आराध्या दैवत श्रीमतोबा महाराज यात्रोत्सव सुरू असून निफाडच्या प्रांताअधिकारी हेमांगी पाटील यांनी श्रीमतोबांचे दर्शन घेऊन देवस्थानाविषयी समाधान व्यक्त केले श्री मतोबा महाराज यात्रोउत्सव दि. २५/ १/ २०२४ पासून सुरू असून ही यात्रा दि. ९ फेब्रुवारी पर्यंत सुरू राहणार आहे .या यात्रोउत्सवा प्रसंगी श्रीमतोबा महाराज यांच्या महाआरतीसाठी राजकीय, सामाजिक ,शासकीय, धार्मिक, क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवरांना श्री मतोबा महाराज यांच्या महाआरतीचा मान दिला जातो या महाआरतीचा मान प्रांताधिकारी हेमांगी पाटील तसेच भारत दिगोळे कांदा उत्पादक शेतकरी संघाचे अध्यक्ष यांना मिळाला असून प्रांताधिकारी हेमांगी पाटील यांनी मतोबा चरणी नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतले व देवस्थानाविषयी समाधान व्यक्त केले, याप्रसंगी राजेंद्र बोरगुडे, बाबुराव शिंदे, दत्तू भवर ,जावेद पठाण, पोलीस पाटील संजय तळेकर, संतोष सानप, तलाठी शंकर खंडागळे ,व आदी भाविक भक्त उपस्थित होते

# प्रजासत्तकदिनी जिथे विहार तिथे ध्वजारोहण

## समाज परिवर्तन युवा संस्था चे उपक्रम





उल्हासनगरः समाज परिवर्तन युवा संस्था आणि पंचशील बुद्ध विहार कमिटी यांच्या संयुक्त विद्यमानाने ध्वजारोहण कार्यक्रम दिनांक २६ १/२०२४ रोजी म्हारल गावं,बौद्ध वाडा या ठिकाणी संपन्न झाला या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक ग्राम पंचायत मा.श्री.उपसरपंच देशमुख साहेब ,ग्रामपंचायत सदस्य दीपक अहिरे सर, समाजसेवक दिनेश गोडांबे सर व सामाजिक कार्यकर्ते अजय जाधव होते तसेच बुद्ध विहार कमिटीचे मेंबर मारुती गायकवाड व त्यांचे सर्व टीम उपस्थित होते घरेलू कामगार महिलांवर काम करणाऱ्या समाजसेविका प्रमिला भोईर व भारतीय ताई गायकवाड तसेच समाजसेवक गणेश गायकवाड, रोहित गायकवाड उपस्थित होते. त्याच बरोबर या कार्यक्रमात दैनिक यश सिद्धी न्यूज चे पत्रकार बाळासाहेब अहिरे . उल्हासनगर शहर युवा अध्यक्ष भरत रणदिवे. उपस्थित होते संस्थेच्या वतीने हा कार्यक्रम अति उत्साहाने साजरा करण्यात आला या कार्यक्रमात संस

# साठे नगर, माणिकपेठ अक्कलकोट येथे आक्रोश मोर्चाचे बैठक संपन्न




अक्कलकोट/प्रतिनिधीः साठे नगर, माणिकपेठ अक्कलकोट येथे येत्या ५ फेब्रुवारी या तारखेला होणाऱ्या आंबेडकरी समाजाच्या वतीने मोर्चाचे आयोजनाच्या निमित्ताने मातंग समाजाची छोटीखानी घरगुती बैठक संपन्न झाली यावेळी अध्यक्ष निवृत्तीजी पारखे,मा.नगरसेविका पुतळाबाई शिरसागर, ताराबाई शिरसागर, संपादक सुभाष रणदिवे, पंच सुरेश पारखे,दिगंबर शिरसागर,मुक्ताबाई ढोबळे,अतुल ढोबळे,हर्षवर्धन देडे व अंबादास शिंगे आदि समाज बांधव उपस्थित होते. प्रस्तावना सलगर ग्रामपंचायत सदस्य परशुराम भगळे यांनी केली तर आभार ज्योतिबा पारखे यांनी मानले.



पंढरपूर/प्रतिनिधीः सौ. माया सतीश देशमुख, रा. पुणे या दानशूर भाविकांने श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या चरणी चांदीची (चंद्र व सूर्य) वस्तू अर्पण केली.त्याचे वजन ३ किलो ११० ग्रॅम असून, रक्कम रुपये २,८२,००० इतके मूल्यांकन होत आहे.सदर भाविकांचा यथोचित सन्मान मंदिरे समितीच्या सदस्या श्रीमती शकुंतला नडगिरे यांच्या हस्ते श्रीची प्रतिमा व उपरणे देऊन करण्यात आला. त्यावेळी विभाग प्रमुख ज्ञानेश्र्वर कुलकर्णी उपस्थित होते.

# उडगी येथील सार्वजनिक वाचनालय असून अडचण नसून खोळंबा;,सदर वाचनालय सार्वजनिक की खाजगी?




**सदर वाचनालय चालक हे निवृत्त शिक्षक असून त्यांनी ते आपल्या घरातच सुरू केलेले आहेत त्यामुळे ह्या वाचनालयाची उघडण्याची वेळ हे वाचनालय चालकाच्या सोयीनुसार व मर्जीनुसार ठरत आहे. असेच एकंदरीत प्रकारावरून दिसून येते वाचनालय चालक हे स्वत: सचिव त्यांच्या पत्नी सभासद त्यांचा मुलगा शिपाई म्हणून कार्यरत आहेत. वाचनालयात वाचकांना असं व्यवस्था अपुरे दिसून येते वाचनालय उघडण्याची वेळ, साप्ताहिक सुट्टी, माहिती अधिकार फलक लेखन नाहीत. त्यामुळे विविध प्रकारच्या सोयी सुविधांचा अभाव आहे. संस्थाचालक गावात राहत नसल्याने वाचकांचे समस्या, त्यांच्या गैरसोयी ह्याकडे नक्कीच दुर्लक्ष होत आहे अशी भावना वाचक वर्गातून उमटत आहेत**

उडगी येथील श्री वीरभद्रेश्र्वर सार्वजनिक वाचनालयास वार्षिक ९६ हजार रुपयांचे दोन टप्प्याच्या माध्यमातून अनुदान मिळते. त्यातील निम्मे अनुदान हे तेथील कर्मचाऱ्यांच्या पगारावर खर्ची तर इतर ग्रंथ, वृत्तपत्रे, जागेचे भाडे, वीज, स्टेशनरी, अधिवेशनसाठी वर्षभरासाठीचे खर्च अशा कामासाठी खर्च केला जातो. सदर वाचनालय बाबत स्थानिक वाचकांची काही लेखी स्वरूपात तक्रार असल्यास सदर वाचनालय बाबतीत स्थळ पाहणी करून सत्यता आढळून आल्यास त्या वाचनालयाचे अनुदान रोखण्यात येईल.– **संतोष जाधव,सोलापूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी**

अक्कलकोट/प्रतिनिधी: ग्रंथालय शास्त्राचे तज्ञ एस. आर. रंगनाथन यांच्या मते ग्रंथालय ही लोकशाही मूल्य जोपासणारी सार्वजनिक संस्था आहे या ग्रंथालयाचे हित लक्षात घेऊन राज्य शासनाने ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये वाचन संस्कृती निर्माण व्हावी. त्यांना दररोजच्या जगाच्या कानाकोपऱ्यातील घडामोडी, विविध योजना आणि सामान्य ज्ञानाची माहिती व्हावी यासाठी शासनाने लाखो रुपयांचे अनुदान देऊन गाव तेथे सार्वजनिक वाचनालयाची योजना सर्व महाराष्ट्रभर राबविलेली आहे. परंतु या योजनेचा अक्कलकोट तालुक्यातील उडगी येथील सार्वजनिक वाचनालय अपवाद ठरत असल्याचे दिसून येत आहे. शासनाच्या वाचनालय संकल्पनेला एक प्रकारे हरताळ फासल्याचाच हा प्रकार नव्हे का?

अक्कलकोट तालुक्यातील उडगी येथील श्री वीरभद्रेश्र्वर सार्वजनिक वाचनालयाची स्थापना १९८४ मध्ये झाली. मात्र सदर वाचनालय बाबत वाचक वर्गातून तीव्र नाराजी असून ग्रंथपाल म्हणून सेवा कार्य करून निवृत्त झालेले शिवानंद बिराजदार यांना वाचनालयाच्या सचिवाने त्यांना मिळणाऱ्या मासिक मानधन ऐवजी वार्षिक तेही अल्प मानधन देऊन बोळवण केली असल्याचे खात्रीशीर समजते. वाचनालयाच्या स्थापनेपासून सदर वाचनालयाचे ग्रंथपाल म्हणून शिवानंद बिराजदार यांनी योग्य ती जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली आहे. मात्र त्यांना वाचनालयाने अनुदान मिळत असताना त्यांच्या हक्काच्या मानधनापेक्षा अल्प मानधन देऊन बोळवण केलेली आहे.

उडगी येथील क दर्जाचे हे वाचनालय असून सदर वाचनालय हे सार्वजनिक ठिकाणी असणे अपेक्षित आहे. मात्र असे न होता सदर वाचनालय चालकाने ते वाचनालय आपल्या घरात सुरू केल्याने वाचक वर्ग ज्ञानामृत घेण्यासाठी जाताना थोडासा संकोचूनच जातो. ह्या ठिकाणी मोजक्याच प्रकारची दैनिके, साप्ताहिक, पाक्षिक, मासिके, उपलब्ध आहेत. ह्या वाचनालयाची नेमकी वेळ किती? हे समजून येत नाही. शासनाकडून वार्षिक दोन टप्प्यात ९६ हजार रुपयांचे अनुदान मिळते. त्या मिळणाऱ्या अनुदानातून वाचनालय चालकांनी ग्रंथ, वृत्तपत्रे, मासिक,जागेचे भाडे, वीज, स्टेशनरी आदींसाठी खर्च करीत असते. मग संबंधित ग्रंथपालला अल्प मानधन का दिले गेले? त्यामुळे शासन देत असलेल्या अनुदान नेमके मुरते कुठे? याचा देखील खुलासा होणे अपेक्षित आहे. संबंधित ग्रंथालय अधिकाऱ्यांनी वाचकांच्या ह्या होणाऱ्या गैरसोयींकडे लक्ष देऊन वाचनालय चालकास योग्य ती समज द्यावी, अशी मागणी वाचक वर्गातून होत आहे.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा संपन्न

## रोजगार मेळाव्यास उमेदवारांचा भरघोस प्रतिसाद



सोलापूर/प्रतिनिधी: नोकरीइच्छुक उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कौशल्य विकास , रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालय पुणे आणि लोकमंगल फाऊंडेशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे विभागातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी पंडीत दीनदयाळ उपाध्याय विभागीय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या रोजगार मेळाव्यास उमेदवारांचा भरघोस प्रतिसाद मिळाला .

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड, सोलापूर रोड येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या रोजगार मेळाव्यास आमदार सुभाष देशमुख, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता प्र.सहायक आयुक्त हनुमंत नलावडे,जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी श्री धुमाळ, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य जाधवर उपस्थित होते. रोजगार मेळाव्याचे निमित्ताने संस्थेत तंत्र प्रदर्शन भरविण्यात आले. सदर प्रदर्शन कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार सुभाष देशमुख यांनी केले. यावेळी उपस्थितांनी संस्थेतील विविध व्यवसायातील प्रशिक्षणार्थी यांनी केलेले प्रोजेक्ट्सचे अवलोकन केले.या प्रसंगी आमदार देशमुख यांनी प्रत्यक्ष प्रशिक्षणार्थी मुले व मुली यांच्याशी संवाद साधला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेतील सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## वाढदिवसाची पार्टी ठरली अखेरची ..

# सोलापुरकर हादरले भीषण अपघातात तीन मित्रांचा जागीच मृत्यू

## घटनास्थळ पाहून पोलिसही हादरले, महावीर चौकात घडला अपघात

सोलापूर/महेश गायकवाड: सोलापूर शहरातील महावीर चौकात अत्यंत भीषण आणि सोलापूर च्या जनतेला आणि पोलिसांना हादरवणारा गंभीर अपघात रविवारी मध्यरात्री घडला असुन या अपघातात सोलापूर शहरातील तीन जिवलग तरूण मित्र जागीच ठार झाले आहेत.

सोलापूर शहरातील महावीर चौकात भीषण अपघात झाला आहे. दुचाकी डिव्हायडर आणि फूटपाथला आदळून तीन मित्रांचा जागेवर मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवारी मध्यरात्री घडली आहे. हे तिघे मित्राच्या वाढदिवसाची पार्टी करून घरी परतत असताना हा अपघात झाला आहे वाढदिवसाची त्यांची ही पार्टी या तिघांसाठी अखेर ची ठरली.इरण्णा बसवलिंगप्पा मठपती (२३ वर्ष, रा. गुरुदेव दत्त नगर, जुळे सोलापूर), निखिल मारुती कोळी (वय २३ वर्ष, रा,अक्षय सोसायटी, जुळे सोलापूर), दिगविजय श्रीधर सोमवंशी (वय वर्ष २१, रा. अक्षय सोसायटी, जुळे सोलापूर) अशी या तिघांची नावं आहेत. हा अपघात मध्यरात्री दीडच्या सुमारास घडल्याची माहिती आहे. हे तिघे रात्री पार्टी करून येत असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. अपघात इतका भीषण होता की, तिघांचे मृतदेह छिन्नविच्छिन्न अवस्थेत भर चौकात पडले होते. मध्यरात्री पेट्रोलिंग करणाऱ्या पोलिसांच्या नजरेस मृतदेह पडले आणि तिघांना शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अपघाताची माहिती कळताच नातेवाईकांनी सकाळपासून शासकीय रुग्णालयात प्रचंड गर्दी केली. ती पार्टी अखेरची ठरली निखिल कोळी याचा मंडप डेकोरेशनचा व्यवसाय आहे. रविवारी निखिलने एका कार्यक्रमात मंडप बांधले होते. निखिलला रविवारी एका कार्यक्रमामधून मंडपचे भाडे आले होते.

**मरण पावलेल्या तिघा मित्रां पैकी एका मित्राचा रविवारी वाढदिवस होता हे तिघे जिवलग मित्र त्याचा वाढदिवस साजरा करून पार्टी करण्यासाठीं सोलापुरातील एका हॉटेल मध्ये जेवण करण्यासाठी गेले, होते, तिथे जेवण करुण हे तिघे रविवारी रात्री उशिरा हे तिघे आपापल्या घराकडे जाण्यासाठी पल्सर या दुचाकीवर बसून निघाले होते, हे तिघे होटगी रोड वरील महावीर चौकात आल्यानंतर त्याच्या मोटार सायकल ची डीवायडर ला धडक बसून हा जीवघेणा अपघात घडला, यात तिघा जिवलग मित्रांचा मृत्यू झाला आहे या तिघांसाठी वाढदिवसाची पार्टी अखेर ची ठरली**



निखिलने दोन्ही जवळच्या मित्रांना रात्री पार्टीचे आमंत्रण दिले. इरण्णा मठपती, दिग्विजय सोमवंशी, निखिल कोळी या तिघांनी सोलापुरातील एका हॉटेलमध्ये जंगी पार्टी केली. पार्टी करून पल्सर या दुचाकी वाहनावरून घरी परत जाताना महावीर चौकात दुचाकी डिव्हायडर आणि फूटपाथला जोरात धडकली. अपघात इतका भीषण होता की तिघे मित्र वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन आदळले. तिघांच्या डोक्याला जबरदस्त मार लागला, रक्तबंबाळ होऊन निखिल, दिग्विजय, इरण्णा यांचा जागेवरच मृत्यू झाला. नातेवाईकांचा शासकीय रुग्णालयात आक्रोशनिखिल कोळी आणि इरण्णा मठपती हे घरात एकुलते एक होते. इरण्णा हा दुचाकी शोरूममध्ये नोकरीला होता, तर दिग्विजय सोमवंशी याचा कटिंग दुकानाचा व्यवसाय होता. तिघांवरही कुटुंबाची जबाबदारी होती. मात्र, एका पार्टीमुळे तिघांना आपला जीव गमवावा लागला. तिघांचे मृतदेह शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी दाखल झाल्यानंतर रोजी सकाळी नातेवाईकांनी प्रचंड गर्दी केली होती.

## मूकनायकच्या १०४ व्या वर्धापनदिनानिमित्त

# 'पत्रकारितेचे मानवतावादी दृष्टीकोनातून चळवळीसाठी योगदान' या विषयावर वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न

छत्रपती संभाजी नगर : समाज जीवनात कार्यरत फुले शाहू आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी समग्र आंदोलन समजून घेणे आवश्यक आहे. आपण सर्वांना ज्ञात आहेच की, ३१ जानेवारी १९२० ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक या पाक्षिकाची सुरुवात केली होती. याची ऐतिहासिक जाणीव ठेवून वर्तमान काळात आपण कुठे आहोत? समग्र चळवळीचे नेतृत्व, कार्यकर्ते, संस्था, संघटना, अनुयायी, हितचिंतक नेमके काय करीत आहेत? यावर नव्याने विचारमंथन व्हावे म्हणून मूकनायक च्या १०४ व्या वर्धापनदिनानिमित्त मूकनायक सप्ताह अंतर्गत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे २८ जानेवारी २०२४ ला आयोजन करण्यात आले होते.



या कार्यशाळेचे उद्घाटन निळे प्रतिक चे संपादक रतनकुमार साळवे यांनी केले. ते याप्रसंगी म्हणाले की, ३१ जानेवारी १९२० ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या मूकनायकचे चळवळीसाठी योगदान लक्षात घेऊन फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या माध्यमातून संचालक बी. बी. मेश्राम यांनीयांनी आर्थिक व्यवहार बाजूला ठेवून आपली भूमिका पार पाडली पाहिजे म्हणून या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. हा एक समाजाला दिशा देणारा स्तुत्य उपक्रम आहे. याची आपण नोंद घेतली पाहिजे. त्यांची तळमळ लक्षात घेता चळवळीचे कार्य पुढे घेऊन जाण्यासाठी ही कृतीशीलता निश्र्चितच वाखाणण्यासारखी आहे. ज्या चळवळीचे वर्तमान पत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्षा प्रमाणे होते. असे बाबासाहेब म्हणाले होते म्हणून विषमतेचे माहेरघर असलेल्या भारत देशात विषमतेची दरी रुंदावत चालली असताना समता प्रस्थापित करण्यासाठी त्या काळात मूकनायकचा जन्म झाला होता. मूकनायक हे एक न्यायाचे विचारपीठ होते.

या प्रसंगी एस. पी. मुंजाळ म्हणाले की, आपल्या कार्याला इतर वृत्तपत्रात पुरेशी जागा मिळत नसल्याने बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्रपणे आपल्या मूकनायक या पाक्षिकाची स्थापना केली. एड. विलास रामटेके म्हणाले की, मानवी मूल्यांवर आधारित विचार जगले पाहिजेत. विषमतेची दरी नष्ट करण्यासाठी जनतेचे प्रबोधन नीट झाले तर जनता त्या विचाराने पेटून उठेल. कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करण्यासाठी ही कार्यशाळा महत्वपूर्ण ठरत आहे. लहान मुलांप्रमाणे कार्यकर्त्यांवर संस्कार केले पाहिजेत. समाजातील ओबीसी, मराठा बांधव दुखावणार नाहीत, याची जाणीव ठेवून त्यांना जोडले पाहिजेत. धनराज गोंडाने म्हणाले की, कोणत्याही चळवळीला यशस्वी होण्यासाठी वृत्तपत्राची नितांत आवश्यकता आहे. १४ फेब्रुवारी १९२० ला बाबासाहेब म्हणाले होते की, इंग्रजी भाषा हे वाघिणीचे दुध आहे. पांडुरंग नंदराम भटकर हे त्या पत्रिकेचे संपादक होते. बाबासाहेब सुद्धा त्या काळात पत्रिका वाटायचे. करिता आपण निर्भीडपणे पत्रकारिता चालविली पाहिजे. आमच्या बहिष्कृत लोकांवर होणा-या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मूकनायकने पार पाडले. स्वहित जोपासताना समाजहित जोपासले पाहिजे. एड. राजू बागूल म्हणाले की, भारत देश विषमतेचे माहेरघर असून यात आप्रेस्ड, डिप्रेस्ड आणि सप्रेस्ड लोक राहायचे त्यांच्या उत्थानासाठी मूकनायकची सुरुवात झाली होती. आवाज इंडिया, दलित दत्तक सारख्या प्रसार माध्यमांची भूमिका आपण समजून घेणे आवश्यक आहे. तराळ–अंतराळ चे लेखक शंकरराव खरात यांनी पत्रकारितेची मजबूत भूमिका पार पाडली. पुढे ते विद्यापीठाचे कुलगुरू झालेत. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा माणूस हा केंद्रबिंदू होता. म्हणून त्यांनी पुढे मानवतावादी दृष्टीकोनातून भारताचे संविधानाची निर्मिती केली आहे. प्रमुख वक्ते समाधान ओंकार इंगळे म्हणाले की, लोकशाहीच्या उत्थानासाठी जनतेचे जनमत घडविण्याकरिता पत्रकारिता हा आजचा ज्वलंत विषय आहे. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेवर त्यांचे गुरुवर्य जान ड्युई यांच्या विद्वत्तेचा गाढा प्रभाव होता. म्हणून त्यांनी प्रबुद्ध भारताच्या उभारणीसाठी आपले आयुष्य वेचले. मानवतावादी दृष्टीकोनातून प्रतित्य समुत्पादाचा सिद्धांत प्रस्थापित केला पाहिजे. समाजवादी, साम्यवादी हे धर्म, अंधश्रद्धेचे प्रचार प्रसार करून त्यांची उद्दिष्टे पूर्ण करतात. बहुसंख्यांक समाज विभाजित असल्याने त्या विभाजित गटातील अल्पसंख्याक समाजाचे होकायंत्र दिशाहीन होत असल्याने लोकशाही धोक्यात आली आहे. करिता आपण सजग राहून मार्गक्रमण केले पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, जनतेचे जनमत तयार करण्यासाठी वृत्तपत्र हे प्रभावी माध्यम आहे. वृत्तपत्र वाचत असताना वाचकांनी दोन ओळीतील व दोन ओळी मागील ( इर्शुिंशशप ींहश श्रळपशी रपव इशहळपव ींहश श्रळपशी) सामावलेला गर्भितार्थ समजून घेतला पाहिजे. समाज जीवनात रस्त्यावर आंदोलन चालविण्यासाठी त्याची योजना मात्र अशाप्रकारच्या कार्यशाळेत अंतर्गत बंद दाराआड ठरविण्यात आली पाहिजे म्हणून कार्यशाळेचे चळवळीत अनन्यसाधारण महत्त्व आहे. स्थळ, काळ, वेळ आणि परिस्थितीचा विचार करून समयसूचकतेनुसार मार्गक्रमण केले पाहिजे. निष्पक्ष पत्रकारिता चालविण्यासाठी वृत्तपत्राचे संपादक मंडळ कसे असावे? याची संहिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ९ मार्च १९४० च्या जनता पत्रात अंतर्भूत केली आहे. त्याची आपण अंमलबजावणी केली पाहिजे. तत्कालीन परिस्थितीत बाबासाहेब आंबेडकरांनी काँग्रेस आणि गांधींनी अस्पृश्यांसाठी काय केले? असा प्रश्र्न विचारला होता. आज वर्तमानात देश स्वतंत्र झाल्यापासून काँग्रेससह युपीए आणि भाजपासह एनडीए यांनी मूलनिवासी बहुजन समाजाच्या उत्थानासाठी काय केले आहे? देशाच्या अर्थसंकल्पात संवैधानिक समूहांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात तरतूद केली जात आहे काय? असे प्रश्र्न आपण वर्तमान व्यवस्थेला विचारले पाहिजेत. एका काळात वृत्तपत्रे छापून विकली जात होती. आता मात्र प्रस्थापित वृत्तपत्राविषयी शंका आहे की, काय ती वृत्तपत्रे विकून छापली जातात? असे असेल तर कुठली वृत्तपत्रे विकत घेऊन आपण वाचली पाहिजेत? हे आपण ठरविले पाहिजे. करिता परिवर्तनवादी विचारांचा प्रचार प्रसार करणाऱ्या वृत्तपत्रांना वाचकवर्ग मिळावा यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. सध्या आपल्या बातम्यांना दैनिक सार्वभौम राष्ट्र, दैनिक यश सिद्धी, दैनिक तुफान क्रांती, दैनिक क्रांती शास्त्र, दैनिक महावृत्त, दैनिक घटनेचा शिल्पकार, दैनिक लोकमत, दैनिक सकाळ, दैनिक सामना, दैनिक लोकपत्र, दैनिक मुक्तनायक, निळे प्रतिक, पैगाम, बहुजन हिताय, लोक प्रसार, हिंदवी समाचार, लोक परिषद, विचार क्रांती न्यूज इत्यादी वृत्तपत्रे ठळक प्रसिद्धी देऊन परिवर्तनवादी विचारांचा प्रचार प्रसार करण्यासाठी सहकार्य करीत आहेत. या सर्वांचेच सहकार्य आपणास विसरता येणार नाही. तरी परिवर्तनवादी विचारांच्या वृत्तपत्राना जगविण्यासाठी आपण आटोकाट प्रयत्न करून धोक्यात आलेली लोकशाही वाचविली पाहिजे. तरच भारताचे संविधान अबाधित राहून समता, स्वतंत्रता, बंधुता व न्यायावर आधारित समाज निर्माण होऊ शकेल. हे करू शकलो तरच मूकनायकचे ऐतिहासिक महत्त्व आपणास कळाले असा त्याचा अर्थ होईल. म्हणून भिन्न भिन्न विषयावर सातत्याने वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळेचे आयोजन करून आपण ऐतिहासिक चळवळीच्या इतिहासाला समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहोत.

कार्यशाळेला एस. पी. मुंजाळ, एड. विलास रामटेके, डी. टी. कांबळे, लोक परिषद चे संपादक प्रवीण बुरुडे, एड. राजू बागूल, धनराज गोंडाने, समाधान ओंकार इंगळे, निळे प्रतिक चे संपादक रतनकुमार साळवे, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

# दयानंद सोनवणे यांची राज्यस्तरीय शैक्षणिक साहित्य प्रदर्शनासाठी निवड

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : राज्य विज्ञान व गणित शिक्षण संस्था नागपूर शिक्षण विभाग जिल्हा परिषद धाराशिव व जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळ धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ५१ व्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात स्वनिर्मित शैक्षणिक साहित्य प्रदर्शनात प्राथमिक विभागात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वसंत नगर नळदुर्ग येथील प्राथमिक शिक्षक सोनवणे दयानंद नामदेव यांनी तयार केलेल्या गणित, विज्ञान व भाषा विकास या शैक्षणिक साहित्यात उच्च भरारी घेत जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.




ज्ञान प्रबोधिनी विद्यालय हराळी ता.लोहारा येथे उप संचालक डॉ.गणपत मोरे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ दयानंद जटनुरे, उप शिक्षणाधिकारी फाटक यांच्या हस्ते मान्यवरांचा हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले शाळेचे अधिकारी, पदाधिकारी,शिक्षक,शाळेचे मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष, सदस्य व पालकांनी नळदुर्ग येथील पत्रकार शिक्षक नागरीकांनी अभिनंदन करत कौतुक केले आहे आणी पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत .



# के .बी.पी. च्या राज्यशास्त्र विभागातील प्राध्यापकांचा माजी विद्यार्थ्यांकडून सत्कार संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधी: के बी पी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागातील प्रा ड्रॉ दत्तात्रय काळेल व प्रा रोहित गायकवाड यांचा माजी विद्यार्थ्यांकडून सत्कार नुकताच संपन्न झाला आहे

प्रा ड्रॉ दत्तात्रय काळेल यांना नुकताच मैत्री संस्था मुंबई यांच्या भारत सन्मान राष्ट्रीय एकात्मता या पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल व प्रा रोहित गायकवाड हे नुकतेच नेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल राज्यशास्त्र विभागातील माजी विद्यार्थ्यांकडून त्यांचा सत्कार करण्यात आला याप्रसंगी राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा ड्रॉ सुशील शिंदे प्रा दत्तात्रय खिलारे विजय जाधव प्राडोले सर प्रा संतोष मते प्रा नितीन कांबळे अभिजीत पिसे विपुल सातपुते यांच्यासह माझे विद्यार्थी उपस्थित होतेर